दिनांक : २५ सप्टेंबर २०१९

महाराष्ट्र शासन

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, अकोला

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अकोला - 444505.

# सुचनापत्र

दिनांक २३ सप्टेंबर २०१९ रोजी akolamsrlm.padbharti.com या संकेतस्थळावर कंत्राटी प्रभाग समन्वयक या पदाचे यादीवर प्राप्त उमेदवारांच्या आक्षेपाचे निराकरण करुन, सर्वसाधारण गुणानुक्रमे सुधारीत यादी व प्रवर्गनिहाय आरक्षणानुसार निवड व प्रतिक्षा यादी फेरप्रसिध्द करण्यात आलेली आहे.

निवड झालेल्या उमेदवारांनी दिनांक २१ सप्टें,२०१९ ते २८ सप्टें,२०१९ पर्यंत उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, अकोला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अकोला येथे उपस्थित होणेबाबत कळविण्यात आल्यानुसार, आतापर्यंत ३९ उमेदवारांनी उपस्थिती नोंदवीली आहे. उर्वरीत ०६ उमेदवारांनी उमेद अभियान कक्ष कार्यालय, अकोला येथे दिनांक २८.९.२०१९ सायंकाळी ५.०० पर्यत आपली उपस्थिती नोंदवावी.

तसेच यासंदर्भात कळविण्यात येते कि, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक,उमेद अकोला यांचे अध्यक्षतेखाली सदर उमेदवारांची समुपदेशनाव्दारे पदस्थापनेची प्रकीया पार पाडण्यात येणार आहे. करिता निवड झालेल्या सर्व ४५ उमेदवारांनी दिनांक ३०/०९/२०१९ रोजी, सकाळी ११.३० वाजता सदर प्रकीयेकरीता उपस्थित रहावे. अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा कोणत्याही प्रकारचा दावा तदनंतर मान्य करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सदस्य सचिव निवड समिती तथा
जिल्हा अभियान व्यवस्थापक,उमेद
अकोला

सहअध्यक्ष,निवड समिती
जिल्हा अभियान सहसंचालक,उमेद
तथा
प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं
अकोला